# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 08/09/2023 (शुक्रवार) सायंकाळ

---

## फसवणुक

पो.स्टे. अरोली :– अंतर्गत १५ किमी अंतरावर मोजा खात येथे दिनांक ०६/०५/२०२३ चे १०.०० वा. ते दिनांक ०६/०९/२०२३ चे १७.०० वा. सायंकाळी दरम्यान यातील **आरोपी नामे– प्रसिक प्रेमदास पटले, वय २४ वर्ष, रा. खात, ता. मौदा, जि. नागपूर** याचे स्वत:चे नेट कॅफे असून तो लोकांना ऑनलाईन लोन काढून देत असतो. फिर्यादी यांनी आरोपी यांचेकडें ऑनलाईन बजाज फायनान्स कडून १,४५,००० /–रू लोन काढले परंतू फिर्यादी यांना तेवढया पैशाची गरज नसल्याने त्यांनी लोनमधील ८०,०००/–रू बजाज फायनान्सला परत करायचे असल्याबाबत आरोपीला सांगितले आरोपीने फिर्यादी यांची फसवणूक करण्याचे उद्देशाने फिर्यादिचे मोबाईलवर अनाधिकृत लींक पाठवून फिर्यादी यांनी आरोपी याने पाठविलेल्या लींकवर ३०,०००/–रू पाठविले परंतू ते बजाज फायनन्सला जमा झाले नाही तेव्हा आरोपी याने फिर्यादी यांना नेटवर्क प्रोब्लेम असल्याचे सांगितले. त्यानंतर टाटा कॅपीटल मधून फिर्यादी यांनी आरोपी यांच्या माध्यमाने ३६,४५६/–रू लोन उचलले आरोपी याने फिर्यादी यांना तूम्ही उचललेले लोन तात्काळ कंपनीला परत करा म्हणजे तूमचे क्रेडीट वाढतो व तूम्हाला मोठा लोन भेटतो असे सांगितल्यावरून फिर्यादी यांनी आरोपी यानी पाठविलेल्या अनाधिकृत लींकवर ३६,४५६/–रू पाठविले परंतू ते टाटा कॅपीटल कंपनीला जमा झाले नाही. याबाबत फिर्यादी यांनी आरोपीला वारंवार विचारणा केली असता १९,०००/–रू परत केले, परंतू ४६,७५६/–रू आजपर्यंत परत केले नाही तसेच आरोपी यांनी गावातील बऱ्याच लोकांना ऑनलाईन लोन उचलून देवून त्यांनी लोन भरण्यासाठी दिलेले पैसे लोन मध्ये न भरता परस्पर विल्हेवाट लावून ऑनलाईन फसवणूक करून पैश्याची अफरातफर केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम ४२०, भादंवि ६६(सी), ६६(ड) आयटी ॲक्ट अधिनियम २००० अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक हदयनारायण यादव पोस्टे रामटेक मो. नं ९८२३९१८४८६ हे करीत आहे.

## अनैतिक देहव्यापार करण्यास प्रवृत्त करणारे आरोपी गजाआड

## अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष यांची कारवाई

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत मौजा माही लॉज धापेवाडा पाटणसावंगी रोड सावनेर येथे दिनांक ०७/०९/२०२३ चे १७.१० वा. ते १८.४५ वा. दरम्यान अनैतीक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष ना.ग्रा येथील पोलीस स्टाफ यांना गुप्त बातमीदारांकडुन माहीती मिळाली की, **आरोपी नामे– १) सुशिल नारायण गजभिये, वय ३२ वर्ष, रा. वार्ड क्र. २ वाघोडा सावनेर २) महेश पांडूरंग निबाळकर वय २६ वर्ष, रा. वार्ड क्र. ३ ब्राम्हणी ता. कळमेश्वर ३) अक्षय बळिराम मश्राम वय २४ वर्ष, रा. एमआयडीसी कळमेश्वर ४) राकेशरोशन रामलाल चौधरी वय २८ वर्ष, रा. नईमा ता. तेलहरा जिल्हा नांलदा राज्य बिहार ह. मु. कळमेश्वर ५) धिरज बाबारावजी पाटील, वय २९ वर्ष, रा. येरजा ता. नरखेड ह. मु. सावंगा शिवा पोस्टे कोढाळी ६) मनिष महादेव वाघमारे, वय २७ वर्ष, रा. वार्ड क्र. ३ ब्राम्हणी ता. कळमेश्वर ७) अनुप ज्ञानेश्वर धोटे, वय २४ वर्ष, रा. कोंढा सावंगा वार्ड क्र. २ काटोल नागपूर ८) मॅनेजर विनोद जर्नाधन खुरपडे, वय ३० वर्ष, रा. वार्ड क्र. २ भालेराव शाळेच्या मागे सावनेर** हे स्वतःचे आर्थिक फायदयाकरीता मुलींना पैशाचे आमिश देवुन देहव्यापारास प्रवृत्त करून त्यांना ग्राहकांना पुरवुन नमुद ठिकाणी येण्यास सांगुन तेथे देह व्यापारास जागा उपलब्ध करून देउन पिडीत मुलींना ग्राहकास पुरवुन देहव्यापार करवुन घेतात. अशी खात्रीशीर माहिती मिळाल्यावरून सदरची माहिती ही मा. पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण यांना देवुन त्यांचे आदेशाने बोगस पंटर पंचनामा कारवाई करून बोगस ग्राहक पाठवुन व त्याच्या इशाऱ्या प्रमाणे पोलीस स्टाफसह रेड कारवाई करून आरोपीतांना ताब्यात घेण्यात आले. माही लॉज मध्ये एक पिडीत मुलगी व बोगस ग्राहक तसेच दुसऱ्या रूममध्ये आणखी एक पिडीता मिळून आल्याने पिडीतांना विचारपूस केली असता माही लॉजचा मालक सुशिल गजभिये रा. सावनेर यांचे सांगण्यावरून ग्राहकांकडून पैसे देहव्यापार करीत असल्याचे सांगितले.

सदर प्रकरणी सरतर्फे फिर्यादी नामे– सहायक पोलीस निरीक्षक अजाब कोठीरान नेवारे, नेमणुक आर्थिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीतांविरुध्द कलम ३, ४, ५ स्त्रीया व मुली अनैतिक व्यापार प्रतिबंधक अधिनिमय १९५६ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक शिवाजी नागवे, पोस्टे सावनेर मो. नं. ९८२३४०३५६५ हे करीत आहे.

सदरची कारवाई ही पोलीस अधीक्षक नागपूर (ग्रामीण) श्री. हर्ष ए. पोद्दार सर (भा.पो.से.) तसेच अपर पोलीस अधीक्षक डॉ. श्री. संदीप पखाले सर यांचे मार्गदर्शनात परीविक्षाधीन पोलीस उप अधिक्षक श्री. राहुल झालटे, पोलीस उप अधिक्षक तथा वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र निकम, सहायक पोलीस निरीक्षक श्री. अजाबराव नेवारे, महिला पोलीस हवालदार ज्योती लोखंडे, महिला पोलीस नायक सारीका इंदुरकर, महिला पोलीस अंमलदार कांचन चंदनखेडे पोलीस अंमलदार प्रफुल भातुलकर, चालक राहुल गडलिंग यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर